ePaper

केदारताल मार्गावर हिमस्खलनामुळे 6 ट्रेकर्सचा मृत्यू; उत्तराखंडमध्ये दुर्घटना



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | शुक्रवार, दि. 06 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...


गणेश तलावाच्या पुनरुज्जीवनासाठी शर्मिला बाबर आक्रमक!

SIR वर विशेष अधिवेशन बोलवा; अमित शाहांचं राहुल गांधींना आव्हान!

SIR वरून संसदेत रणकंदन?

महाईन्यूज । नवी दिल्ली

SIR च्या विरोधात काँग्रेस पक्ष आणि इंडिया आघाडी आक्रमक झाली आहे. दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हरियाणा दौऱ्या दरम्यान भाषण केलं आणि राहुल गांधींना उत्तर दिलं आहे. राहुल गांधींना पराभव सहन झालेला नाही असंही अमित शाह म्हणाले.



AI Generated Images

सलग तिसऱ्यांदा हरियाणातल्या जनतेने भाजपाला संधी दिली. हरियाणानंतर महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक होती तिथेही काँग्रेसचा सुपडा साफ झाला. दिल्लीत भाजपा जिंकली. आसाममध्ये जिंकलो. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जींचा सुपडा साफ झाला. या सगळ्या पराभवांमुळे राहुल गांधी बावचळले आहेत. राहुल गांधींना पराभव सहन झालेला नाही त्यामुळे ते आपल्या अपयशाचं खापर निवडणूक आयोगावर आणि SIR वर फोडत आहेत असं अमित शाह म्हणाले.

पुढे अमित शाह म्हणाले, राहुलबाबा २०१४ मध्ये कुठे SIR होतं? तेव्हाही तुमचा सुपडा साफ झाला. २०१९ मध्येही SIR नव्हतं तरीही तुम्ही हरलात. २०२४ मध्येही एसआयआर नव्हतं तरीही तुम्ही हरलात. मी राहुल गांधींना या मंचावरून आव्हान देतो आहे की चर्चा करायची असेल तर मोदींना एक पत्र लिहा. आम्ही एसआयआरवर चर्चा करण्यासाठी संसदेचं विशेष अधिवेशन बोलवू. तुम्ही फक्त खोटं बोलणं सोडून द्या. मी आज देशाला सांगू इच्छितो आहे १३ कोटी नावं छाटली असा आरोप काँग्रेस करते आहे. याचे तपशील सांगतो. २ कोटी ८० लाख नागरिक असे आहेत ज्यांचा मृत्यू झाला. ६ कोटी २५ लाख असे लोक आहेत जे दुसऱ्या राज्यांमध्ये गेले आहेत. त्यामुळे त्यांचं मतदान या ठिकाणी कसं होईल? एक कोटी लोक असे आहेत ज्यांची नावं तीन याद्यांमध्ये होती. त्यातली एकाच यादीत राहिली. जे ३ कोटी उरले आहेत ती नावंच राहुल गांधींना सतवत आहेत. हे लोक निवडणूक आयोगासमोर येत नाहीत, कारण हे तीन कोटी घुसखोर आहेत. घुसखोरांची नावं छाटली आहेत म्हणून राहुल गांधी उर बडवत आहेत.

राहुल गांधींना प्रश्न आहे की...

राहुल गांधींना माझा प्रश्न आहे जरा त्यांनी सांगावं लग्नाला १० वर्षे झाली असतील तर १२ मुलं होतील का? मतदार यादीत असेही लोक आहेत ज्यात मुलगा वडिलांपेक्षा मोठा आहे. ६०० स्क्वेअर फुटांच्या घरात १३२ लोक राहतात असं होऊ शकतं का? आम्ही अशीच घुसखोरी करणाऱ्यांची तीन कोटी नावं छाटली आहेत. तुमच्या घुसखोर बचाओ रॅलीने काय साध्य होणार नाही असंही अमित शाह म्हणाले. तुम्ही लाखो लोक येतील असं सांगितलं होतं. रामलीला मैदानाची क्षमता ७० हजार आहे. त्यात निम्मे लोकही नव्हेत. दिवस कुठला निवडला तर १ नोव्हेंबरचा. कारण याच दिवशी १९८४ मध्ये काँग्रेसने शिखांचं शिरकाण केलं होतं आणि दंगल उसळली होती अशी टीकाही अमित शाह यांनी केली.

घुसखोरांना मतदार यादीतून हटवणारच : शाह

भाजपाचा संकल्प आहे की आम्ही घुसखोरांना शोधणारा आणि मतदार यादीतून हटवू. त्यानंतर आम्ही त्यांना देशाबाहेरही घालवू हे राहुल गांधी यांनी विसरू नये. इंडिया आघाडीची जे आंदोलन आहे ते घुसखोरांचं रक्षण करण्यासाठी आहे. संविधानाचं रक्षण करण्यासाठी नाही. मोदींचा संकल्प आहे की शोधा, डिलिट करा आणि मतदार यादी स्वच्छ करा आणि डिपोर्ट म्हणजे देशाबाहेर काढा. निवडणूक आयोगाने प्रत्येक राजकीय पक्षाला BLA ठेवण्याची संमती दिली आहे. निवडणूक आयोग SIR करताना काँग्रेसचे BLA काय करत होते असा सवालही अमित शाह यांनी केला आहे.



‘सोमेश्वर’च्या अध्यक्षपदी राजवर्धन शिंदे

उपाध्यक्षपदी संग्राम सोरटे यांची बिनविरोध निवड; अनुभवासोबत सामाजिक समीकरणांचाही समतोल

महाईन्यूज । पुणे

सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्ष व उपाध्यक्षपदाची निवड गुरुवारी (दि. ५) बिनविरोध पार पडली. अध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे अनुभवी सोमेश्वरचे माजी अध्यक्ष राजवर्धन शिंदे यांना संधी मिळाली, तर उपाध्यक्षपदी ओबीसी प्रवर्गातील सलग दोन वेळा संचालक पद भूषवत असलेले संग्राम सोरटे यांना संधी देण्यात आली.



उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि खासदार पार्थ पवार यांनी घेतलेल्या निर्णयातून अनुभवासोबत सामाजिक समीकरणांचाही समतोल साधण्यात आला आहे. कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीत सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील पॅनेलने २१ पैकी २१ जागा जिंकत निर्विवाद वर्चस्व मिळविले होते. या पार्श्वभूमीवर अध्यक्षपदासाठी राजवर्धन शिंदे या अनुभवी चेहऱ्याला अध्यक्षपदाची संधी देण्याचा निर्णय झाला.

राजवर्धन शिंदे यांनी अध्यक्षपदाची हॅट्ट्रिक साधली आहे. अनुभवी नेतृत्वासह तरुण चेहऱ्यांनाही संधी मिळण्याची चर्चा होती. मात्र, कारखान्याचा अनुभव, प्रशासकीय कामकाजाची जाण आणि सहकार क्षेत्रातील योगदान यांना प्राधान्य देण्यात आले. उपाध्यक्षपद ओबीसी प्रवर्गाला देत सामाजिक समतोल साधण्याचाही प्रयत्न झाला. राज्यातील आघाडीच्या कारखान्यांमध्ये गणना होणाऱ्या सोमेश्वर कारखान्याच्या नव्या संचालक मंडळापुढे आता मोठी आव्हाने आहेत. एकीकडे बारामती तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती, तर दुसरीकडे आगामी गळीत हंगामाचे नियोजन, ऊस उत्पादकांना समाधानकारक दर, आर्थिक शिस्त आणि कारखान्याची प्रगती या बाबी महत्त्वाच्या ठरणार आहेत. राज्यात एक नंबरचा दर देणाऱ्या सोमेश्वरच्या नव्या नेतृत्वाकडून सभासद आणि ऊस उत्पादकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्यामुळे राजवर्धन शिंदे यांच्या नेतृत्वाखालील संचालक मंडळ आगामी काळात कोणत्या पद्धतीने कारभार करते, याकडे सभासदांसह संपूर्ण बारामती तालुक्याचे लक्ष लागले आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादन खर्चावर नियंत्रण

कारखान्याच्या कारभारात सातत्य राखण्यासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उत्पादन खर्चावर नियंत्रण आणि सहवीज प्रकल्प व उपपदार्थ निर्मितीच्या माध्यमातून उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण करण्यावर नव्या संचालक मंडळाला भर द्यावा लागणार आहे. तसेच ऊस उत्पादकांना वेळेवर बिले अदा करणे, तोडणी-वाहतूक व्यवस्थेत पारदर्शकता आणणे आणि सभासदांच्या समस्या प्राधान्याने सोडविणे आवश्यक ठरणार आहे.

पुण्याला नोव्हेंबर ते जूनसाठी १३.२ टीएमसी पाणी द्या

महाईन्यूज । पुणे

खडकवासला धरण साखळीतून पावसाळ्यात कालवा आणि नदीद्वारे सोडण्यात आलेले पाणीपुणे महापालिकेच्या वार्षिक पाणी कोट्यात धरू नये. तसेच १ नोव्हेंबर २०२६ ते ३० जून २०२७ या आठ महिन्यांच्या कालावधीसाठी पुणे शहराला स्वतंत्रपणे १३.२ टीएमसी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. कालवा समितीच्या बैठकीत पुण्याच्या पाणी कोट्यात सुमारे पाच टीएमसीची कपात करण्यात आल्याने आगामी उन्हाळ्यात शहरासमोर पाणीटंचाईचे संकट निर्माण होऊ शकते, अशी भीती त्यांनी निवेदनातून व्यक्त केली आहे.



पुणे जिल्ह्याच्या कालवा समितीची बैठक २९ ऑक्टोबर रोजी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत झाली. या बैठकीत पुणे शहरासाठी १३.२ टीएमसी पाणी कोटा मंजूर करण्यात आला. मात्र, हा कोटा नेमका कोणत्या कालावधीसाठी आहे, याबाबत संभ्रम आहे. यंदा एल निनोमुळे पावसाचे प्रमाण विस्कळीत राहिल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासन आणि जलसंपदा विभागाच्या आदेशानुसार महापालिकेने महिनाभरापासून आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्यास सुरुवात केली आहे. पाणी बचतीबाबत जनजागृतीही केली जात आहे. दुसरीकडे, पुढील दोन महिन्यांत जायका नदी सुधार प्रकल्पांतर्गत नऊ सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) कार्यान्वित होणार आहेत. त्यामुळे मुंढवा जॅकवेल प्रकल्पातून शेतीसाठी सुमारे ६.५ टीएमसी पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. त्यामुळे शहराच्या पाण्याची मागणी आणखी वाढू शकते. परिणामी, ऐन उन्हाळ्यात पुणेकरांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो. हे संकट टाळण्यासाठी पावसाळ्यात सोडण्यात आलेले पाणी वार्षिक कोट्यातून वगळून नोव्हेंबर ते जून २०२७ या कालावधीसाठी स्वतंत्रपणे १३ टीएमसी पाणी मंजूर करण्याचे आदेश जलसंपदा विभागाला द्यावेत, अशी मागणी भिमाले यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

नदीद्वारे तब्बल १९ टीएमसी पाणी

पावसाळ्यात या धरणांमधून कालवा आणि नदीद्वारे तब्बल १९ टीएमसी पाणी सोडण्यात आले. विशेष म्हणजे पावसाळ्यात सुरू करण्यात आलेल्या कालव्यातून आजही शेतीसाठी पाणी सोडले जात आहे. त्यामुळे धरणसाखळीतील पाणीसाठा २४ टीएमसीपर्यंत खाली आला आहे. या परिस्थितीत पुणे शहराच्या पाणी कोट्याचे योग्य नियोजन होणे आवश्यक आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे दिवाळीनंतर पुण्यात स्थलांतरित होणाऱ्या नागरिकांची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

गणेश तलावाच्या पुनरुज्जीवनासाठी शर्मिला बाबर आक्रमक!

कासव-माशांच्या मृत्यूचे गूढ उकलण्याची मागणी; पाण्याची गुणवत्ता तपासण्यावर भर

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

निगडी येथील गणेश तलावात मोठ्या संख्येने कासव आणि मासे मृत अवस्थेत आढळल्याच्या घटनेची गंभीर दखल घेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर यांनी तलावाच्या संवर्धनासाठी पुढाकार घेतला आहे. या घटनेची सखोल चौकशी करून तलावातील जलचरांचे संरक्षण आणि तलावाच्या पुनरुज्जीवनासाठी तातडीने आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी महानगरपालिकेचे सभागृहनेते प्रशांत शितोळे आणि नगरसदस्य शत्रुघ्न (बापू) काटे उपस्थित होते.



निगडी परिसरातील गणेश तलाव हा नागरिकांसाठी महत्त्वाचे विरंगुळ्याचे ठिकाण असून, परिसरातील पर्यावरणीय समतोल आणि जैवविविधतेच्या दृष्टीनेही त्याचे विशेष महत्त्व आहे. मात्र, तलावात कासव आणि मासे मृत अवस्थेत आढळल्याने पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. तलावातील पाण्याची गुणवत्ता, साचलेला गाळ आणि इतर संभाव्य कारणांची तांत्रिक तपासणी होणे आवश्यक असल्याचे उपमहापौर शर्मिला बाबर यांनी निवेदनात नमूद केले.

तलावातील पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासून जलचरांच्या मृत्यूचे नेमके कारण शोधावे, तलावातील साचलेला गाळ काढून स्वच्छता करावी तसेच तलावाच्या दीर्घकालीन संवर्धनासाठी आणि पुनरुज्जीवनासाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करावा, अशी मागणी त्यांनी केली. यासोबतच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी तलावाच्या पाण्याच्या गुणवत्तेची नियमित तपासणी आणि आवश्यक देखभाल व्यवस्था निर्माण करण्यावरही त्यांनी भर दिला.

गणेश तलावाच्या संवर्धनाचे आव्हान!

निगडी येथील गणेश तलावात कासव आणि मासे मृतावस्थेत आढळल्याने तलावाच्या पर्यावरणीय स्थितीबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. तलावातील जलचरांचे मृत्यू नेमके कशामुळे झाले, याचा शोध घेण्यासाठी पाण्याची प्रयोगशाळेत तपासणी, प्रदूषणाच्या स्रोतांची पाहणी आणि साचलेल्या गाळाची स्वच्छता करणे गरजेचे आहे. केवळ तात्पुरती स्वच्छता न करता तलावाच्या दीर्घकालीन संवर्धनासाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. तलावातील जैवविविधता जपून त्याचे नैसर्गिक स्वरूप टिकवावे आणि भविष्यात अशा घटना घडू नयेत, यासाठी महापालिकेने ठोस कृती आराखडा तयार करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

> “शहरातील नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन, पर्यावरणाचे संरक्षण आणि जलचरांचे अस्तित्व टिकवणे ही सामूहिक जबाबदारी आहे. गणेश तलावा सह इतर गोष्टींचे मूळ नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यावरणीय समृद्धी जपण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहू.”
>
> **- शर्मिला बाबर, उपमहापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

यावेळी महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्याशी चर्चा करत उपमहापौर शर्मिला बाबर यांनी या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन संबंधित विभागाला तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्याची विनंती केली. तलावाचे पर्यावरणीय महत्त्व लक्षात घेता या प्रश्नाकडे केवळ स्वच्छतेचा विषय म्हणून न पाहता जलचरांचे संरक्षण आणि नैसर्गिक जैवविविधतेचे संवर्धन या दृष्टीने पाहणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

१५ वर्षांचा वनवास संपणार? पवना जलवाहिनी प्रकल्पाला गती!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

गेल्या १५ वर्षांपासून रखडलेल्या पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाला आता गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीने या प्रकल्पासाठी अर्थसंकल्पात १२१ कोटी १५ लाख रुपयांची वाढीव तरतूद करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे प्रकल्पाची निविदा प्रक्रिया राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कामाचे तीन टप्पे करून प्रत्येक टप्प्यासाठी स्वतंत्र निविदा काढण्यात येणार असल्याने प्रकल्प लवकर पूर्ण करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.

स्थायी समितीची सभा अध्यक्ष अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या सभेत पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पासाठी आवश्यक निधीची तरतूद वाढविण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली. यापूर्वी सुमारे ४०० कोटी रुपयांचा असलेला हा प्रकल्प कालांतराने वाढलेल्या खर्चामुळे सुमारे १ हजार २०० ते १ हजार ५०० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला आहे. प्रकल्पासाठी केंद्र सरकारच्या अर्बन चॅलेंज फंडातून निधी उपलब्ध करून घेण्याचे नियोजन आहे.

महापालिकेच्या जेएनएनयूआरएम-पाणीपुरवठा टप्पा एक या लेखाशीर्षाखाली यापूर्वी ५१६ कोटी ३१ लाख रुपये उपलब्ध आहेत. सन २०२६-२७ च्या मूळ अर्थसंकल्पात १२४ कोटी ५५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मात्र, सुधारित अर्थसंकल्पातील निधीची उपलब्धता कमी पडत असल्याने निविदा प्रक्रिया रखडली होती. नियमानुसार निविदा प्रसिद्ध करण्यासाठी अंदाजपत्रकीय रकमेच्या २५ टक्के निधी उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे महापालिकेच्या पाणीपुरवठा विशेष योजनेच्या लेखाशीर्षातून निधीचे वर्गीकरण करून आवश्यक तरतूद उपलब्ध करण्यात येणार आहे.

पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प पूर्ण झाल्यास पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेला मोठा आधार मिळणार आहे. मात्र, १५ वर्षांपासून रखडलेल्या या प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात कधी सुरू होते आणि किती कालावधीत पूर्ण होते, याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

३४.७१ किमी जलवाहिनी!

या प्रकल्पांतर्गत मावळ तालुक्यातील पवना धरणापासून निगडी प्राधिकरणातील सेक्टर क्रमांक २३ येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत ३४.७१ किलोमीटर लांबीची आणि १ हजार ८०० मिलिमीटर व्यासाची समांतर भूमिगत जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. यापैकी शहर हद्दीतील ४.४० किलोमीटर जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ३०.३१ किलोमीटरचे काम अद्याप बाकी आहे. धरणाजवळ अशुद्ध जलउपसा केंद्र, जॅकवेल, पंपिंग स्टेशन आणि ब्रेक प्रेशर टाकी उभारण्यात येणार आहे.



तीन टप्प्यांत कामाचे नियोजन

प्रकल्पाचे काम वेगाने पूर्ण करण्यासाठी तीन स्वतंत्र टप्प्यांत निविदा काढण्यात येणार आहेत. त्यानुसार सुधारित आराखडा तयार करण्यासाठी तांत्रिक सल्लागार नेमणे, धरण परिसरातील जलउपसा यंत्रणा उभारणे आणि धरणापासून जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत जलवाहिनी टाकणे, अशी कामे केली जाणार आहेत. त्यासाठी अनुक्रमे १ कोटी १५ लाख, २० कोटी, ४० कोटी आणि ६० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

भूमिका

शहरीकरणाच्या वेगवान प्रवासात वाहतूक व्यवस्था हा विकासाचा महत्त्वाचा आधार ठरतो. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि वाहतूककोंडी यामुळे शहरांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होत असताना मेट्रो हा आधुनिक, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक पर्याय म्हणून पुढे आला आहे.

मेट्रोच्या वेगाने विकासाला नवी दिशा!



मेट्रो ही केवळ प्रवासाचे साधन नसून शहराच्या आर्थिक, सामाजिक आणि औद्योगिक विकासाला गती देणारी जीवनवाहिनी आहे. पुण्यातील 'हिंजवडी ते शिवाजीनगर' या मेट्रो मार्गाच्या महत्त्वपूर्ण टप्प्याचे लोकार्पण झाल्याने पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे.

देशातील वेगाने विकसित होणाऱ्या शहरांमध्ये पुण्याचा अग्रक्रमाने समावेश होतो. पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही शहरांचा विस्तार, वाढती लोकसंख्या आणि ६४ लाखांहून अधिक वाहनसंख्या पाहता सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे बळकटीकरण ही काळाची गरज बनली आहे. पिंपरी-चिंचवड ते स्वारगेट आणि कोथरूड ते रामवाडी या कार्यान्वित मेट्रो मार्गांना प्रवाशांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. दररोज एक लाख ६० हजारांहून अधिक प्रवासी या मार्गांचा वापर करतात. गणेशोत्सवादरम्यान ही संख्या तीन लाखांहून अधिक होते. यातून मेट्रोची उपयुक्तता आणि नागरिकांचा वाढता विश्वास अधोरेखित होतो.

मेट्रोमुळे प्रवासाचा वेळ वाचतो, वाहतूककोंडी कमी होते आणि इंधनाच्या वापरासह कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण मिळविण्यास मदत होते. निश्चित वेळापत्रकामुळे नोकरदार, विद्यार्थी, व्यावसायिक आणि उद्योजकांना वेळेचे नियोजन करणे शक्य होते. प्रवासातील अनिश्चितता कमी झाल्याने उत्पादकता वाढते. शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सहज पोहोचता येत असल्याने रोजगार, शिक्षण आणि व्यवसायाच्या संधीही अधिक सुलभ होतात.

मेट्रोचा विकास केवळ प्रवासी वाहतुकीपुरता मर्यादित नाही. मेट्रो मार्गाच्या परिसरात व्यावसायिक केंद्रे, निवासी प्रकल्प आणि विविध उद्योगांना चालना मिळते. ग्रामीण भाग आणि शहरांमधील संपर्क वाढल्याने बाजारपेठांचा विस्तार होतो. मेट्रो डबे निर्मिती, अभियांत्रिकी, सिग्नलिंग यंत्रणा, देखभाल आणि तंत्रज्ञान क्षेत्रांत रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतात. त्यामुळे मेट्रो प्रकल्प हा शहराच्या अर्थव्यवस्थेला चालना देणारा महत्त्वपूर्ण घटक ठरतो. देशात सध्या अनेक शहरांमध्ये मेट्रो प्रकल्प सुरू असून आगामी काळात या जाळ्याचा विस्तार अधिक वेगाने होण्याची अपेक्षा आहे. पुण्यातही पुढील दहा वर्षांत शंभर किलोमीटरपेक्षा अधिक मेट्रो मार्गांचे जाळे उभारण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, मेट्रोचा अपेक्षित लाभ मिळविण्यासाठी तिचे बससेवा, उपनगरी रेल्वे, सायकल मार्ग आणि पादचारी सुविधांशी प्रभावी एकत्रीकरण करणे आवश्यक आहे. मेट्रो स्थानकांपर्यंत सहज पोहोचण्याची सुविधा, परवडणारे तिकीटदर आणि नियमित सेवा यांनाही प्राधान्य द्यावे लागेल.

वाढत्या शहरीकरणाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी मेट्रो हा अत्याधुनिक आणि दूरदृष्टीचा पर्याय आहे. केंद्र आणि राज्य सरकार, महापालिका तसेच संबंधित यंत्रणांनी समन्वयातून मेट्रोचे जाळे अधिक व्यापक करणे गरजेचे आहे. विकासाचा वेग आणि पर्यावरणाचा समतोल साधणारी मेट्रो ही भविष्यातील शहरांची ओळख ठरणार आहे. सुरक्षित, गतिमान आणि शाश्वत प्रवासाच्या माध्यमातून मेट्रो विकासाची चाके अधिक वेगाने पुढे नेणारी आधुनिक जीवनवाहिनी ठरत आहे.

प्रासंगिक »

स्वतःचे कर्तृत्व!

एका गावात दोन कुंभार राहत होते. दोघेही सुंदर मडकी बनवत असत. मात्र, पहिला कुंभार आपली मडकी बाजारात विकताना इतरांच्या मडक्यांतील दोष दाखवत असे. दुसरा मात्र स्वतःच्या कामाचा दर्जा सुधारण्यावर लक्ष देत असे.

एकदा गावात मोठी प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आली. पहिल्या कुंभाराने प्रतिस्पर्ध्यांची तक्रार करण्यात वेळ घालवला. दुसऱ्या कुंभाराने मात्र वेगवेगळ्या आकारांची, आकर्षक नक्षीकाम केलेली मडकी तयार केली.


प्रदर्शनाच्या दिवशी परीक्षकांनी दोघांचेही काम पाहिले. पहिल्या कुंभाराची मडकी चांगली असूनही त्याच्या नकारात्मक वागणुकीमुळे ग्राहक त्याच्यापासून दूर राहिले. दुसऱ्या कुंभाराच्या कामाचे सर्वांनी कौतुक केले. त्याला प्रथम क्रमांक मिळाला.

पहिल्या कुंभाराला आपली चूक समजली. दुसऱ्याला कमी लेखण्यापेक्षा स्वतःची गुणवत्ता वाढवणे अधिक महत्त्वाचे असल्याची जाणीव त्याला झाली.

- तात्पर्य : दुसऱ्यांना कमी दाखवून मोठे होता येत नाही; स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करूनच खरे यश मिळते.

अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकीत डेमोक्रॅटिक पक्षाला प्रतिनिधीगृह आणि सिनेट या दोन्ही सभागृहांत बहुमत मिळाल्याने राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सत्तेला मोठा राजकीय धक्का बसला आहे.

ट्रम्प यांच्या मनमानीला संसदीय लगाम!



हा निकाल केवळ सत्ताधारी रिपब्लिकन पक्षावरील नाराजीचे प्रतिबिंब नसून, ट्रम्प यांच्या धोरणांबाबत अमेरिकन जनतेने व्यक्त केलेला असंतोषही आहे. महागाई, वाढते इंधनदर, इराणमधील संघर्ष आणि आयात शुल्काच्या धोरणांमुळे सामान्य नागरिकांच्या जीवनावर झालेला परिणाम या निवडणुकीत निर्णायक ठरला.

ट्रम्प यांनी डेमोक्रॅट्सचे अभिनंदन केले असले, तरी हा निकाल आपल्या नेतृत्वाला नकार नसल्याचे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोन्ही सभागृहांत विरोधकांचे वर्चस्व निर्माण झाल्याने त्यांच्या निर्णयप्रक्रियेवर निश्चितच मर्यादा येणार आहेत. युद्धखर्च, परराष्ट्र धोरण, इस्रायलला लष्करी मदत आणि अन्य आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर आता काँग्रेसमध्ये अधिक सखोल चर्चा आणि तपासणी होऊ शकते. त्यामुळे राष्ट्राध्यक्षांच्या मनमानी निर्णयांना संस्थात्मक विरोध वाढण्याची शक्यता आहे. मात्र, संसदेतील बहुमत बदलले म्हणजे राष्ट्राध्यक्षांचे सर्व अधिकार संपले, असे नाही. अमेरिकेच्या राज्यघटनेनुसार परराष्ट्र धोरण आणि लष्करी निर्णयांमध्ये राष्ट्राध्यक्षांची भूमिका महत्त्वाची आहे. काँग्रेस निधीवर नियंत्रण ठेवू शकते आणि विविध धोरणांवर सुनावण्या घेऊ शकते; परंतु प्रत्यक्ष निर्णय बदलणे तितके सोपे नाही. त्यामुळे ट्रम्प यांच्यावर अंकुश येईल, पण त्यांची निर्णयक्षमता पूर्णपणे संपुष्टात येणार नाही.

या राजकीय घडामोडींचे परिणाम भारतासाठीही महत्त्वाचे आहेत. अमेरिकेचे वाढते आयात शुल्क, रशियन तेलाच्या खरेदीवरून निर्माण झालेला दबाव आणि पाकिस्तानबाबतची भूमिका यामुळे भारत-अमेरिका संबंधांमध्ये काही प्रमाणात तणाव निर्माण झाला आहे. डेमोक्रॅट्सच्या वर्चस्वामुळे भारताला काही धोरणात्मक मुद्द्यांवर संवादाची नवी संधी मिळू शकते. मात्र, केवळ सत्तासमीकरण बदलल्याने अमेरिकेचे भारतविषयक धोरण बदलेल, अशी अपेक्षा ठेवणे चुकीचे ठरेल. विशेषतः आखाती देशांतील संघर्ष आणि इंधनदरातील चढ-उतार भारताच्या अर्थव्यवस्थेसाठी चिंतेचे विषय आहेत. तेलाच्या किमती वाढल्यास महागाई, आयात खर्च आणि रुपयाच्या मूल्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे भारताने ऊर्जास्रोतांचे वैविध्य, तेलसाठ्यांची क्षमता आणि आर्थिक स्थैर्य यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

अमेरिकेतील निवडणूक निकालाने लोकशाहीतील सत्तासमतोलाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. कोणत्याही नेत्याला अमर्याद अधिकार नसतात, हा संदेश यातून मिळतो. भारताने या बदलत्या परिस्थितीत कोणत्याही एका राजकीय पक्षावर अवलंबून न राहता राष्ट्रीय हिताला प्राधान्य द्यावे. संधीचा लाभ घेताना सावधगिरी आणि मुत्सद्देगिरीचा समतोल राखणे, हेच भारतासाठी योग्य ठरेल.

।। अभंगवाणी ।।



मायबाप जोहार ।
सारा साधावया आलों वेसकर ॥१॥

मागील पुढील करा झाडा ।
नाहीं तरी खोडा घालिती जी ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

दुष्काळी तालुक्यांची संख्या वाढणार

राज्यातील टंचाईग्रस्त भागात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी सातत्याने होत आहे

महाईन्यूज । नागपूर

राज्यातील टंचाईग्रस्त भागात दुष्काळ जाहीर करण्याची मागणी सातत्याने होत आहे. लोकप्रतिनिधींकडून पाठपुरावा केला जात आहे. अशा टंचाईग्रस्त भागात १५ नोव्हेंबरपर्यंत प्रत्यक्ष पाहणी केली जाईल. प्रत्यक्ष पाहणीत ज्या तालुक्यांमध्ये दुष्काळी स्थिती दिसून येईल, अशा तालुक्यांचा दुष्काळी तालुक्यांमध्ये समावेश केला जाणार आहे. त्यामुळे राज्यातील दुष्काळी तालुक्यांमध्ये वाढ होईल, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांनी दिली आहे.



राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणी टंचाई निवारणाची कामे वेगाने पूर्ण करण्यासाठी सन २०२४ – २५ आणि २०२५ – २६ मधील कामांचा प्रलंबित निधी येत्या १५ दिवसांत सर्व जिल्हा परिषदा आणि जिल्हाधिकाऱ्यांना वितरित करावा. तसेच सन २०२५ – २६ मधील विहीर अधिग्रहण आणि टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची प्रलंबित देयके तातडीने अदा करण्याचे निर्देश दिले आहेत. दुष्काळी भागातील नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी जलसंधारण विभागासह कृषी व अन्य संबंधित विभागांनी समन्वयाने नियोजन करावे. एकाच कामाची पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता घेऊन उपलब्ध निधी दुष्काळ निवारणाशी संबंधित कामांकडे वळवावा, असे निर्देशही दुष्काळ निवारण समितीचे अध्यक्ष, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत.

मराठवाडा आणि पश्चिम विदर्भातील फळबागा वाचविण्यासाठी पाणी आणि अनुदानाची आवश्यकता असून, संबंधित शेतकऱ्यांना हेक्टरी मदत मिळावी, अशी मागणी रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी केली. त्यावर मदतीचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाकडून मदत उपलब्ध न झाल्यास राज्य शासनामार्फत मदत देण्याबाबत मुख्य सचिवांनी अभ्यास करून पुढील बैठकीत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

याशिवाय, दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन पाणीटंचाईग्रस्त भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश देण्यात आले. जिल्हा प्रशासनाने स्थानिक परिस्थितीचा विचार करून पाणीपुरवठा, रोजगारनिर्मिती आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावे. शेतकऱ्यांच्या फळबागांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक पाणी व आर्थिक मदत वेळेत उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. दुष्काळ निवारणासाठी निधीचा प्रभावी विनियोग करून नागरिक आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळेल.

रोजगार हमीच्या दरात वाढ

व्हीबी-जीरामजी योजनेतील अकुशल मजुरांच्या दरांचा पुनर्विचार करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीने दरवाढीबाबत निर्णय घेऊन पुढील दहा दिवसांत शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही करण्याचे आदेश समितीने मुख्य सचिवांना दिले आहेत, त्यानुसार रोजगार हमीच्या मजुरीत वाढ होणार आहे. गाळपेरा जमिनीवर रोजगार हमी योजनेतून मका, ज्वारी आणि बाजरीची लागवड करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तलावांतील गाळ काढणे आणि खोलीकरणाच्या कामांत अनियमितता झाली असेल, तेथे आवश्यक कारवाई करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

‘लढाई संसदेतच होईल, पण रस्त्यावर लढायची वेळ आल्यास आम्ही मागे हटणार नाही’

महाईन्यूज । कोल्हापूर

नागपुरात महायुतीच्या वतीने महापदयात्रेचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी ‘लोकशाही वाचवा, अराजकता हटवा’ अशी घोषणा देत भाजपाने शक्तिप्रदर्शन केलं. भाजपा महायुतीच्या वतीने राबवण्यात आलेल्या या पदयात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे सहभागी झाले आहेत. यशवंत स्टेडियम येथून संविधान चौकापर्यंत ही पदयात्रा काढण्यात आली. त्यापूर्वी यशवंत स्टेडियमवर सभेचं आयोजन करण्यात आलं होतं.



या सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर टीका केली. “आता लढाई संसदेत नाही, रस्त्यावर होणार,” असं राहुल गांधी म्हणाले होते. त्यांच्या या विधानाचा संदर्भ देत फडणवीस यांनी संविधान असेपर्यंत लढाई संसदेतच होईल; मात्र रस्त्यावर लढण्याची वेळ आली तर त्यासाठीही आम्ही तयार आहोत, असं म्हटलं.

यावेळी त्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून शक्तिप्रदर्शन करण्याचा इशारा दिला. “आम्ही रस्त्यावर लढण्यासाठीही तयार आहोत. तुम्ही एक जण याल तर आम्ही एक हजार येऊ, तुम्ही हजार जण याल तर आम्ही एक लाख येऊ आणि तुम्ही लाखाने याल तर आम्ही एक कोटी लोक येऊ. हा भारताची हुंकार आहे,” असं फडणवीस म्हणाले.

आपली लढाई केवळ भाजपाची किंवा राष्ट्रीय लोकशाही आघाडीची नसून देशाच्या संविधानासाठी आहे, असेही फडणवीस म्हणाले. संविधानाच्या संरक्षणासाठी आणि लोकशाही टिकवण्यासाठी महायुतीचे घटक पक्ष एकत्र आल्याचं त्यांनी नमूद केलं.

दरम्यान नागपुरातील या महापदयात्रेच्या माध्यमातून भाजपाने ‘लोकशाही वाचवा, अराजकता हटवा’ असा संदेश देत विरोधकांच्या भूमिकेवर टीका केली. फडणवीस यांच्या राहुल गांधींवरील विधानामुळे या पदयात्रेतील भाषणाची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

यावेळी फडणवीस यांनी विरोधकांच्या आंदोलनाच्या भूमिकेवरही जोरदार निशाणा साधला. देशात लोकशाही व्यवस्था आणि संविधान अस्तित्वात असेपर्यंत प्रत्येक प्रश्नावर संसदेत चर्चा होणे आवश्यक आहे. मात्र, विरोधकांनी रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची भूमिका घेतल्यास भाजप आणि महायुतीचे कार्यकर्तेही त्याला समर्थपणे उत्तर देतील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशातील जनतेचा पाठिंबा आपल्या बाजूने असल्याचे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण केला.

फडणवीस यांनी पुढे सांगितले की, संविधान हे देशाच्या लोकशाही व्यवस्थेचा पाया असून त्याचे संरक्षण करणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे. संविधानाच्या नावाखाली जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे आणि लोकशाही व्यवस्थेबाबत गैरसमज पसरवण्याचे प्रयत्न खपवून घेतले जाणार नाहीत. देशाची एकता, अखंडता आणि लोकशाही मूल्ये जपण्यासाठी भाजप आणि महायुती कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

‘संविधान असेपर्यंत लढाई संसदेतच होईल’

फडणवीस म्हणाले, “राहुल गांधी, तुम्ही म्हणाला होता की, आता लढाई संसदेत नाही, तर रस्त्यावर होईल. एक गोष्ट लक्षात ठेवा, जोपर्यंत बाबासाहेब आंबेडकरांचं संविधान आहे, तोपर्यंत लढाई संसदेतच होईल. पण रस्त्यावर लढण्याची वेळ आली, तर त्यासाठीही आम्ही कमी नाही, हे दाखवण्यासाठी आज आम्ही एकत्र आलो आहोत.”

इस्रायलमध्ये बेंजामिन नेतान्याहूंना मोठा धक्का!

अरब पक्षांच्या पाठिंब्यामुळे गादी आयसेनकोट यांचा बहुमताचा आकडा पार

महाईन्यूज । इस्रायल

इस्रायलच्या राजकारणाला नवं वळणं मिळालं आहे. पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांच्या हातातून सत्ता जाण्याची चिन्हे स्पष्ट दिसत असून त्यांचे प्रमुख विरोधक आणि माजी लष्करप्रमुख गादी आयसेनकोट यांच्या पंतप्रधान होण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. इस्रायलमधील प्रमुख अरब राजकीय आघाडी 'जॉइंट लिस्ट'ने आयसेनकोट यांना पाठिंबा जाहीर केला आहे. या महत्त्वाच्या पाठिंब्यामुळं आयसेनकोट यांना सरकार स्थापनेसाठी बहुमताचा ६१ जागांचा टप्पा पार करत तब्बल ६७ सदस्यांचं समर्थन मिळणार असल्याचं निश्चित झाले आहे. 'हिंदूस्तान टाइम्स' नं या संदर्भातलं वृत्त दिलं आहे.





पक्ष / आघाडी	एकूण जागा / पाठिंबा
नेतान्याहू यांचा गट (लिकुड व मित्रपक्ष)	५३ जागा (बहुमतापासून दूर)
गादी आयसेनकोट यांना मिळालेला एकूण पाठिंबा	६७ खासदार (बहुमत सिद्ध)
जॉइंट लिस्ट (अरब आघाडी)	११ जागा
रा-अम (अरब पक्ष)	८ जागा

नेतान्याहू यांच्यासाठी हा एक मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. 'एएफपी' या वृत्तसंस्थेनं दिलेल्या माहितीनुसार, जॉइंट लिस्टनं अधिकृत निवेदन जारी करत अध्यक्ष आयझॅक हरझॉग यांच्याकडं सरकार स्थापनेसाठी 'याशार' पक्षाचे प्रमुख गादी आयसेनकोट यांच्या नावाचीच शिफारस करणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. दीर्घकाळापासून सत्तेत असणारे नेतान्याहू यंदा पुन्हा एकदा सत्ता स्थापन करतील असा दावा केला जात होता. परंतु अरब पक्षांनी एकत्र येत घेतलेल्या या एकाच निर्णयामुळे सत्ता समीकरणे पूर्णपणे उलटली आहेत.

नेतान्याहू यांच्या लिकुड पक्षाच्या आघाडीला बहुमतासाठी आवश्यक असलेला आकडा गाठता आलेला नाही. दुसरीकडे, विरोधकांनी आणि अरब पक्षांनी मिळून ६७ चा आकडा गोळा करून नेतान्याहू यांना पूर्णपणे पिछाडीवर टाकले आहे.

पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांच्या सत्तेला सुरुंग लागण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. २७ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत कोणत्याही एका गटाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने मोठा राजकीय पेच निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर विरोधकांनी एकत्र येत नेतान्याहू यांना सत्तेवरून हटवण्यासाठी मोठी रणनीती आखली आहे. इस्रायलमधील सर्व प्रमुख विरोधी पक्षांनी माजी लष्करप्रमुख आणि यांना पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून पाठिंबा जाहीर केला आहे.

६१ चा आकडा पार

इस्रायलच्या १२० जागांच्या संसदेत बहुमतासाठी ६१ खासदारांच्या पाठिंब्याची गरज असते. नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला किंवा आघाडीला स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते. मात्र, अरब पक्षांच्या आघाडीने १२० पैकी तब्बल १९ जागांवर ऐतिहासिक विजय मिळवला होता. यापूर्वीच ८ जागा जिंकणाऱ्या 'रा-अम' या अरब पक्षाने आयसेनकोट यांना पाठिंबा जाहीर केला होता. त्यानंतर आता ११ खासदार असलेल्या 'जॉइंट लिस्ट'नेही आयझेनकोट यांच्या पारड्यात आपले मत टाकल्याने, त्यांच्या समर्थकांचा आकडा थेट ६७ वर पोहोचला आहे.

केदारताल मार्गावर हिमस्खलनामुळे ६ ट्रेकर्सचा मृत्यू; उत्तराखंडमध्ये ट्रेकिंगदरम्यान दुर्घटना

महाईन्यूज । उत्तराखंड

उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील निसर्गरम्य पण तितक्याच आव्हानात्मक असलेल्या केदारताल ट्रेकिंग मार्गावर एक दुर्दैवी घटना घडली आहे. आठवड्यापूर्वी आलेल्या हिमस्खलनामुळे बेपत्ता झालेल्या आठ ट्रेकर्सपैकी गुरुवारी आणखी दोन जणांचे मृतदेह शोधून काढण्यात यश आले आहे. यासोबतच या दुर्घटनेतील मृतांची संख्या आता ६ वर पोहोचली असून, उर्वरित दोन ट्रेकर्सचा शोध अजूनही सुरू आहे. या संदर्भातील वृत्त PTI या वृत्तसंस्थेने दिले आहे.





हिमस्खलनामुळे दुर्घटनेच्या ठिकाणी तब्बल १० ते १२ फूट बर्फाचा थर साचला आहे. त्यामुळे बचाव पथकांना शोधमोहीम राबवताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. गुरुवारी सापडलेले हे दोन्ही मृतदेह बेस कॅम्पवर आणण्यात आले असून, शुक्रवारी हेलिकॉप्टरच्या साहाय्याने ते मातली हेलिपॅडवर आणले जातील.

गंगोत्री येथून २७ ऑक्टोबर रोजी १३ जणांचे एक पथक केदारताल ट्रेकसाठी रवाना झाले होते. यामध्ये ७ ट्रेकर्स आणि ६ स्थानिक मार्गदर्शक यांचा समावेश होता. हे सर्वजण २९ ऑक्टोबरपर्यंत परतणे अपेक्षित होते. मात्र, वाटेत झालेल्या मुसळधार हिमवृष्टीमुळे आणि हिमनद्यांच्या मार्गातील अडथळ्यांमुळे त्यांचा परतीचा मार्ग पूर्णपणे बंद झाला.

सध्या केदारखडक परिसरात SDRF आणि NIM च्या १० सदस्यांची तुकडी बचावकार्यात गुंतली आहे. शुक्रवारी उर्वरित दोन बेपत्ता ट्रेकर्सचा शोध घेण्यासाठी पुन्हा एकदा व्यापक संयुक्त मोहीम राबवली जाणार असल्याचे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

बुधवारी सापडलेल्या दोन मृतदेहांची ओळख पटली असून, ते दोन्ही मृतदेह पश्चिम बंगालच्या बांकुरा जिल्ह्यातील सालबनी भागातील रहिवासी होते. नातेवाईकांनी घटनास्थळी पोहोचून या मृतदेहांची ओळख पटवली आहे.

१० ते १२ फूट बर्फाखाली बचावकार्य सुरू

उत्तरकाशी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन केंद्राने दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी सकाळी ९ वाजता राज्य आपत्ती प्रतिसाद दल आणि 'नेहरू इन्स्टिट्यूट ऑफ माउंटेनियरिंग' यांच्या संयुक्त पथकाने बचावकार्य पुन्हा सुरू केले. अत्यंत प्रतिकूल हवामान आणि बर्फाच्छादित दऱ्यांमध्ये दुपारच्या ३.३० वाजेपर्यंत चाललेल्या या मोहिमेत दोन पुरुषांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले.



प्रेमात पडणं हा पहिला गुन्हा

'नटरंग' चित्रपटातील 'वाजले की बारा' या गाजलेल्या लावणीमुळे अभिनेत्री अमृता खानविलकरला प्रचंड लोकप्रियता मिळाली. आपल्या अभिनयासोबतच नृत्य आणि हटके अंदाजामुळे अमृताने मराठी मनोरंजनविश्वात वेगळी ओळख निर्माण केली आहे. तिचा चाहतावर्गही मोठा आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमुळे अभिनेत्री चर्चेत आली आहे. एका मुलाखतीदरम्यान अमृताला तिच्या आयुष्यातील तीन गुन्हे कोणते, असा प्रश्न विचारण्यात आला. यावेळी अभिनेत्रीने चक्क पाटीवर तीन गोष्टी लिहून आपल्या मजेशीर अंदाजात उत्तर दिले. प्रेमात पडणे, गोड पदार्थ खाणे आणि आळस करणे हे आपले तीन गुन्हे असल्याचे तिने सांगितले. अमृता म्हणाली, "मला असं वाटतं की, हे तीन गुन्हे मी केलेले आहेत. प्रेमात पडणं हा माझा पहिला गुन्हा आहे. गोड खाणे हा माझा दुसरा गुन्हा आहे. मी खूप गोड पदार्थ खाते. आणि तिसरा म्हणजे आळस." आपल्या पहिल्या गुन्ह्याबद्दल बोलताना अमृताने प्रेमाविषयी मजेशीर प्रतिक्रिया दिली. ती म्हणाली, "आता हा गुन्हा नको. प्रेमात पडल्यानंतर ते जे पडून राहणं असतं, ते मला आता नको." तसेच गोड खाण्याच्या सवयीबद्दल बोलताना ही सवय अजूनही सुटलेली नसल्याचे तिने सांगितले. तर आळस हा देखील आपल्या आयुष्यातील एक गुन्हा असल्याचे अमृताने गंमतीने कबूल केले. अमृता खानविलकर सोशल मीडियावरही प्रचंड सक्रिय असते. इन्स्टाग्रामवर फोटो, व्हिडीओ आणि रील्सच्या माध्यमातून ती चाहत्यांच्या संपर्कात राहते. तिचे हटके लूक्स, नृत्य आणि स्पष्टवक्तेपणामुळे ती अनेकदा चर्चेत असते. दरम्यान, या मुलाखतीतील तिच्या मजेशीर उत्तरांची चाहत्यांमध्ये चर्चा रंगली आहे.



फटाके फोडणं म्हणजे देशविरोधी कृत्य!

दिवाळी म्हटलं की दिवे, फराळ आणि फटाक्यांची आतषबाजी आलीच. मात्र, फटाक्यांमुळे होणारे वायुप्रदूषण आणि त्याचा आरोग्यावर होणारा परिणाम यावर दरवर्षी चर्चा होते. याच पार्श्वभूमीवर अभिनेत्री आणि आलिया भट्टची आई सोनी राजदान यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये त्यांनी फटाके फोडण्यावर स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली आहे. इतकंच नाही, तर फटाके फोडणं हे आरोग्याच्या आणि जीवनाच्या विरोधात असून देशविरोधी कृत्य असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. काही दिवसांपूर्वी अभिनेत्री दिया मिर्झाच्या प्रदूषणविरोधी व्हिडिओवरून वाद निर्माण झाला होता. त्यानंतर सोनी राजदान यांच्या या पोस्टचीही चर्चा सुरू झाली आहे. सोनी राजदान यांनी आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवरून ही पोस्ट शेअर केली आहे. दिवाळीच्या काळात फटाके फोडण्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाचा सर्वाधिक परिणाम लहान मुलांच्या आरोग्यावर होत असल्याचं त्यांनी पोस्टमध्ये म्हटलं आहे. त्या म्हणाल्या की, लहान मुलांच्या पालकांना विचारलं तर वायुप्रदूषणामुळे त्यांच्या मुलांना किती त्रास सहन करावा लागतो, हे ते सांगू शकतील. प्रदूषणामुळे मुलांना आजारपणाचा सामना करावा लागतो. अनेकदा त्यांना तब्येतीच्या कारणामुळे शाळेतही जाता येत नाही.

'रामायण'ची बॉक्स ऑफिसवर ऐतिहासिक सुरुवात.!

भारतीय सिनेसृष्टीतील सर्वाधिक महत्त्वाकांक्षी आणि भव्य चित्रपटांपैकी एक म्हणून चर्चेत असलेल्या नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण'ने प्रदर्शनाच्या पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर मोठी खळबळ उडवली आहे. आता चित्रपट प्रदर्शित होताच त्याच्या कमाईचे आकडे समोर येण्यास सुरुवात झाली असून, पहिल्याच दिवशी तब्बल १०० ते १४० कोटी रुपयांचा गल्ला जमवण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. विशेष म्हणजे, 'धुरंधर २'च्या पहिल्या दिवसाच्या कमाईचा विक्रमही 'रामायण' मोडणार का, याकडे संपूर्ण सिनेसृष्टीचे लक्ष लागले आहे. २० ऑक्टोबरपासून चित्रपटाच्या ॲडव्हान्स बुकिंगला सुरुवात झाली होती. सुरुवातीपासूनच तिकीट खिडकीवर प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळत आहे. चित्रपट व्यापारावर लक्ष ठेवणाऱ्या वेबसाइटच्या माहितीनुसार, सकाळी ८ वाजेपर्यंत 'रामायण'ने ५.४४ कोटी रुपयांची कमाई केली होती.



दिवसभरात प्रेक्षकांची गर्दी वाढल्यास या आकड्यात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. मात्र, चित्रपटाच्या प्रत्यक्ष कमाईचे अधिकृत आकडे समोर आल्यानंतरच बॉक्स ऑफिसवरील त्याच्या कामगिरीचे खरे चित्र स्पष्ट होईल. 'रामायण' चित्रपटातील कलाकारांची निवड सुरुवातीपासूनच चर्चेचा विषय ठरली आहे. या चित्रपटात रणबीर कपूर भगवान श्रीराम यांच्या भूमिकेत, तर साई पल्लवी सीतेच्या भूमिकेत दिसत आहे. याशिवाय यश रावण, रवि दुबे लक्ष्मण, अरुण गोविल, इंदिरा कृष्णन, विवेक ओबेरॉय आणि लारा दत्ता यांच्याही महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. विशेष म्हणजे, रावणाच्या भूमिकेतील यशच्या लूक आणि दमदार पडद्यावरील उपस्थितीची विशेष चर्चा रंगली आहे. त्याच्या व्यक्तिमत्त्वामुळे रावणाची भूमिका अधिक प्रभावी ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दुसरीकडे, शूर्पणखेच्या भूमिकेत रकुल प्रीत सिंह दिसणार असून, तिच्या लूकनेही चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे.

रोनाल्डोचा आंतरराष्ट्रीय फुटबॉलला अलविदा!

२३ वर्षांच्या ऐतिहासिक कारकिर्दीला पूर्णविराम; २४३ सामने आणि १४६ गोलचा विक्रम नावावर

महाईन्यूज । पोर्तुगाल

आंतरराष्ट्रीय फुटबॉल विश्वातील लोकप्रिय खेळाडूंपैकी एक असलेला पोर्तुगालचा स्टार फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोने आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. गुरुवारी एका विशेष व्हिडिओ संदेशाद्वारे ४१ वर्षीय रोनाल्डोने आपल्या २३ वर्षांच्या प्रदीर्घ आणि ऐतिहासिक आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला ब्रेक लावला. नोव्हेंबरमधील आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या मालिकेनंतर आपण पोर्तुगालची प्रसिद्ध 'जर्सी क्रमांक ७' सोडणार असल्याचे त्याने स्पष्ट केले.

आपल्या निवृत्तीच्या व्हिडिओमध्ये रोनाल्डोने चाहत्यांचे आणि देशाचे आभार मानत भावना व्यक्त केल्या. रोनाल्डो म्हणाला, "आज पोर्तुगालच्या राष्ट्रीय संघासाठीचा मैदानावरील माझा प्रवास संपत आहे. मी देशासाठी दिलेल्या योगदानाचा अभिमान बाळगून निरोप घेत आहे. मी पोर्तुगालसाठी माझे सर्वस्व पणाला लावले याचे मला पूर्ण समाधान आहे."

पुढे बोलताना तो म्हणाला, "काळाच्या ओघात मी केलेले गोल मागे पडतील, मिळालेले चषक संग्रहालयात जमा होतील आणि विक्रमही मोडले जातील. परंतु, लोकांच्या हृदयात आपण निर्माण केलेले स्थान काळ कधीही पुसू शकत नाही. जगात सर्वोत्कृष्ट खेळाडू बनण्यासाठी मी माझे संपूर्ण आयुष्य वेचले, परंतु जगातील सर्वोत्तम देशाचे प्रतिनिधित्व करणे हीच माझी सर्वात मोठी कमाई आहे हे मला आज समजले. या २३ वर्षांच्या प्रवासात माझ्यावर विश्वास ठेवल्याबद्दल तुम्हा सर्वांचे मनापासून आभार!"

रोनाल्डोची ही निवृत्ती एका घडामोडीनंतर समोर आली आहे. अवघ्या दोन आठवड्यांपूर्वी पोर्तुगीज फुटबॉल फेडरेशनने रोनाल्डोला संघातून ३० दिवसांसाठी निलंबित केले होते आणि त्याला २८५ डॉलरचा दंड ठोठावला होता.

सप्टेंबर महिन्यात 'नेशन्स लीग'दरम्यान प्रशिक्षक जीझस यांनी नॉर्वेविरुद्धच्या सामन्यात रोनाल्डोला अंतिम संघात स्थान दिले नव्हते. या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करत रोनाल्डोने थेट संघाचे प्रशिक्षण शिबिर सोडून काढता पाय घेतला होता. त्यानंतर त्याने प्रशिक्षक जीझस यांच्यावर कराराचे पालन न केल्याचा आरोप करत गंभीर टीका केली होती.

असोसिएटेड प्रेसच्या माहितीनुसार, १ ऑक्टोबर रोजी डेन्मार्कविरुद्धच्या सामन्याच्या दिवशी हे निलंबन लागू झाले होते. रोनाल्डोच्या गैरहजेरीतही पोर्तुगालने डेन्मार्क आणि नॉर्वेचा पराभव करत युएफा नेशन्स कपच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली आहे.



आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधील सर्वोत्तम आकडेवारी

फुटबॉल इतिहासात पोर्तुगालचे प्रतिनिधित्व करताना रोनाल्डोने २४३ सामन्यांत तब्बल १४६ गोल नोंदवून आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये सर्वाधिक सामने खेळण्याचा आणि सर्वाधिक गोल करण्याचा ऑल-टाइम वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे; शिवाय मँचेस्टर युनायटेड आणि रिअल माद्रिदकडून खेळताना ६ वेळा चॅम्पियन्स लीगचे विजेतेपद पटकावण्यासोबतच पोर्तुगालला 'युरो कप' व 'नेशन्स लीग'चे विजेतेपद मिळवून देण्यातही त्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरली होती.

४०व्या वर्षी शतकी दणका, ब्रेंडन टेलरचं आठ वर्षांनी कसोटीत शतक

महाईन्यूज । शारजा

झिम्बाब्वेचा माजी कर्णधार आणि अनुभवी फलंदाज ब्रेंडन टेलरने अफगाणिस्तानविरुद्ध शारजा इथे सुरू झालेल्या कसोटीत ४०व्या वर्षी खणखणीत शतक साजरं केलं. २००० नंतर कसोटीत शतक झळकावणारा दुसरा सगळ्यात वयस्क फलंदाज ठरला आहे. पाकिस्तानच्या ४२वर्षीय मिसबाह उल हकने २०१६ मध्ये शतकी खेळी केली होती.






तब्बल आठ वर्षांनंतर ब्रेंडनने कसोटीत शतक झळकावलं आहे. त्याने शेवटचं शतक २०१८ मध्ये झळकावलं होतं.

झिम्बाब्वेचा नवनियुक्त कर्णधार ब्रायन बेनेटने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. इनोसंट किआने ३४ तर बेन करनने ४२ धावांची खेळी केली. अनुभवी ब्रेंडन तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आला. त्याने अफगाणिस्ताच्या गोलंदाजांचा समाचार घेत एकेरी, दुहेरी धावा आणि चौकार, षटकार यांची सुरेख सांगड घातली. ब्रेंडनने बेनसह दुसऱ्या विकेटसह ६५ तर कर्णधार बेनेटसह तिसऱ्या विकेटसाठी १३७ धावांची भागीदारी केली. सलीमच्या गोलंदाजीवर चौकार लगावत ब्रेंडनने कारकिर्दीत सातवं शतक साजरं केलं. शतकानंतरही टेलरने तोच फॉर्म कायम राखला. अखेर हशमतुल्ला शाहिदीने त्याला बाद केलं. त्याने १४ चौकार आणि ४ षटकारांसह १३१ धावांची खेळी केली.

नियमित कर्णधार रिचर्ड नकाराग्वा दुखापतग्रस्त झाल्याने झिम्बाब्वेच्या निवडसमितीने २२वर्षीय ब्रायन बेनेटकडे नेतृत्वाची धुरा सोपवली. युवा कर्णधाराच्या संघात तीन ४० किंवा त्यापेक्षा जास्त वयाचे खेळाडू आहेत. टेलरच्या बरोबरीने ग्रीम क्रीमर आणि क्रेग अर्व्हाइन यांचा त्यात समावेश आहे. तांत्रिक नियमांची पूर्तता केल्याने झिम्बाब्वेने अँतूम नक्वीला पदार्पणाची संधी दिली. जन्म बेल्जियममध्ये, मूळ पाकिस्तानी वंशाचा आणि ऑस्ट्रेलियात राहिलेल्या नक्वीने झिम्बाब्वेतील डोमेस्टिक क्रिकेटमध्ये खोऱ्याने धावा केल्या आहेत.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। शुक्रवार ।
दि. 06 नोव्हेंबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



वाढदिवसाचा आनंद बळीराजासाठी समर्पित

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी २ लाख ५१ हजारांची मदत; आमदार गोरखेंचा आदर्शवत निर्णय!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

वाढदिवसानिमित्त भव्य सत्कार, स्वागत समारंभ आणि फराळावर होणारा खर्च टाळून विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला आहे. राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी त्यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीत २ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मंत्रालयात सदिच्छा भेट घेऊन त्यांनी हा धनादेश प्रदान केला. वाढदिवसाचा आनंद समाजातील गरजू घटकांच्या मदतीतून साजरा करण्याच्या त्यांच्या निर्णयाचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी कौतुक केले.



राज्यातील काही भागांत दुष्काळ आणि विविध नैसर्गिक संकटांमुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. अशा परिस्थितीत बळीराजाला आर्थिक आधार देणे आणि त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी असल्याची भावना आमदार गोरखे यांनी व्यक्त केली. वाढदिवसाच्या निमित्ताने स्वागत-सत्कार आणि अन्य कार्यक्रमांवर खर्च करण्याऐवजी ही रक्कम शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

मंत्रालयात झालेल्या भेटीदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार गोरखे यांच्या या लोककल्याणकारी उपक्रमाचे कौतुक केले. वैयक्तिक आनंदाच्या प्रसंगाला सामाजिक जबाबदारीची जोड देणारा हा निर्णय इतर लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. समाजातील संकटग्रस्त घटकांना मदतीचा हात देण्याची भावना सार्वजनिक जीवनात अधिक दृढ होण्याची आवश्यकता असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.

वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छा स्वीकारण्याचा किंवा सत्कार करून घेण्याचा दिवस नसून, समाजाप्रती असलेल्या कर्तव्याची जाणीव करून देणारा प्रसंग आहे, अशी भूमिका आमदार गोरखे यांनी मांडली. समाजातील गरजू घटकांच्या मदतीसाठी प्रत्येकाने आपापल्या परीने योगदान दिल्यास संकटग्रस्त कुटुंबांना मोठा आधार मिळू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, आमदार अमित गोरखे यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने राबवलेल्या या उपक्रमाचे पिंपरी-चिंचवड शहरातील सामाजिक आणि राजकीय वर्तुळातून स्वागत होत आहे. वैयक्तिक आनंदोत्सवाऐवजी शेतकरीहिताला प्राधान्य देत त्यांनी सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला आहे.

> "संकटाच्या काळात आपल्या बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे आणि गरजूंच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणे, हे मी माझे सामाजिक कर्तव्य मानतो. जनतेने माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, त्याची परतफेड समाजसेवा करूनच करणे हे माझे ध्येय आहे."
> - अमित गोरखे, आमदार, महाराष्ट्र विधान परिषद

दुष्काळग्रस्तांसाठी मुख्यमंत्र्यांकडे धनादेश सुपूर्द

सध्या राज्यातील काही भागांत शेतकरी विविध संकटांचा सामना करत आहेत. अशा बिकट परिस्थितीत बळीराजाला धीर देणे आणि त्यांना आर्थिक आधार देणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आपले आद्य कर्तव्य आहे, अशी भूमिका आमदार अमित गोरखे यांनी या प्रसंगी मांडली. मंत्रालयात झालेल्या या सदिच्छा भेटीदरम्यान मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी आमदार अमित गोरखे यांच्या या संवेदनशील व लोककल्याणकारी निर्णयाचे मनापासून कौतुक केले. राजकीय व सामाजिक क्षेत्रात वाढदिवसासारख्या वैयक्तिक आनंदाच्या क्षणी असे लोकोपयोगी उपक्रम राबवणे इतर कार्यकर्त्यांसाठी व नेत्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्र्यांनी काढले.

मेट्रो प्रवाशांना दिलासा; पीएमपीच्या १२ मार्गांवर दररोज ६२० बसफेऱ्या!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

मेट्रो प्रवाशांना स्थानकांपर्यंत पोहोचणे अधिक सोयीचे व्हावे, यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) फीडर बससेवेचा विस्तार केला आहे. बुधवारपासून (दि. ४ नोव्हेंबर) ११ नवीन फीडर बसमार्ग सुरू करण्यात आले असून, एका जुन्या मार्गाचा विस्तार करण्यात आला आहे. एकूण १२ मार्गांवर दररोज ६२० बसफेऱ्यांचे नियोजन करण्यात आले असून, २२ नवीन बसथांबे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.



माण-हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गिका सुरू झाल्याच्या पार्श्वभूमीवर पीएमपीएमएलने हा निर्णय घेतला आहे. नवीन बसमार्गांमध्ये पिंपरी मेट्रो स्थानक ते वाकड चौक, माण एमआयडीसी, इन्फोसिस फेज तीन, म्हाळुंगे, ताथवडे, पुनावळे, लवळे फाटा, टीसीएस माण मेट्रो स्थानक, ब्ल्यू रिज सोसायटी आणि बालेवाडी परिसरांचा समावेश आहे.

या सेवेसाठी २५ नियोजित शेड्यूलनुसार दररोज ६२० बसफेऱ्या चालविण्यात येणार आहेत. त्यामुळे हिंजवडी आयटी पार्कमधील कर्मचारी, विद्यार्थी आणि नोकरदार वर्गासह पिंपरी-चिंचवड व पुण्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. मेट्रो स्थानकांपर्यंतचा प्रवास सुलभ होऊन खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे. नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पीएमपीएमएल प्रशासनाने केले आहे.

फीडर बससेवेचा विस्तार; मेट्रो प्रवाशांना दिलासा!

मेट्रो स्थानकांपर्यंत प्रवाशांना सहज पोहोचता यावे, यासाठी पीएमपीएमएलने फीडर बससेवेचे जाळे विस्तारले आहे. या सेवेमुळे हिंजवडी आयटी पार्कमधील कर्मचारी, विद्यार्थी आणि नोकरदार वर्गाला मोठा फायदा होणार आहे. मेट्रो आणि बससेवेच्या समन्वयातून खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होणार आहे.

पिंपरीच्या वाहतुकीला नवी गती; उड्डाणपुलाचे लोकार्पण

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते ल क्षेत्रीय कार्यालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन!

महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड

पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक गतिमान, सुरक्षित आणि सुरळीत करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या पिंपरी डेअरी फार्म येथील रेल्वे उड्डाणपुलाचे लोकार्पण तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ल क्षेत्रीय कार्यालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या शुभहस्ते आज पार पडले. या दोन्ही विकासकामांमुळे शहरातील पायाभूत सुविधांमध्ये भर पडणार असून, नागरिकांना अधिक चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

महापौर रवी लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला आमदार उमा खापरे, अमित गोरखे, उपमहापौर शर्मिला बाबर, माजी महापौर योगेश बहल यांच्यासह महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, आर. पी. आय. गटनेते कुणाल वाव्हळकर, नगरसदस्य जितेंद्र ननावरे, कुशाग्र कदम, संदीप वाघेरे, डब्बू आसवानी, पंकज भालेकर, विराज लांडे, धर्मपाल तंतरपाळे, नगरसदस्या संगिता ताम्हाणे, भीमाताई फुगे, मनीषा लांडे, वर्षा जगताप, निकिता कदम, प्रियांका कुदळे, प्रतीक्षा जवळकर, सारिका मासुळकर, अरूणा लंघोटे, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, माजी नगरसदस्य राजेंद्र जगताप, शाम लांडे, माजी नगरसदस्या सीमा सावळे, सुनिता वाघेरे, सुजाता पालांडे, आशा शेंडगे, उपायुक्त अण्णा बोदडे, अतुल पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

पिंपरी डेअरी फार्म येथे उभारण्यात आलेल्या रेल्वे उड्डाणपुलामुळे मुंबई-पुणे रेल्वे मार्गावरील रेल्वे फाटक (एल सी नं.६०) बंद होणार आहे. त्यामुळे या मार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांना रेल्वे फाटक बंद असताना थांबून राहण्याची आवश्यकता भासणार नाही. दापोडी-निगडी रस्त्याकडून पिंपरी गावात जाणाऱ्या नागरिकांना आता विनाथांबा प्रवास करता येणार असून, त्यामुळे प्रवासाचा वेळ व श्रम कमी होण्याबरोबरच इंधनाचीही बचत होणार आहे.



पिंपरी, पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरातील नागरिकांना दापोडी-निगडी रस्त्याला पोहोचण्यासाठी हा मार्ग अधिक सोयीचा आणि जवळचा पर्याय ठरणार आहे. यामुळे परिसरातील अंतर्गत वाहतूक अधिक सुलभ होण्यास मदत होईल. तसेच शगुन चौकमार्गे इंदिरा गांधी पुलावरून दापोडी-निगडी रस्त्याकडे जाणाऱ्या वाहनांची वर्दळ कमी होण्यास मदत होणार आहे.

याशिवाय, पिंपरी, पिंपळे सौदागर आणि रहाटणी येथील नागरिकांना संत तुकाराम नगर मेट्रो स्टेशनपर्यंत जलदगतीने पोहोचण्यासाठी पर्यायी मार्ग उपलब्ध होणार आहे. रेल्वे फाटकामुळे निर्माण होणारा विलंब टाळता येणार असल्याने दैनंदिन कामासाठी प्रवास करणारे नागरिक, नोकरदार वर्ग तसेच वाहनचालकांना या पुलाचा मोठा फायदा होणार आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ल क्षेत्रीय कार्यालयाच्या नूतन इमारतीचे भूमिपूजनही यावेळी करण्यात आले. क्षेत्रीय कार्यालय हे नागरिक आणि महापालिका प्रशासन यांच्यातील महत्त्वाचे संपर्क केंद्र आहे. परिसरातील नागरिकांना विविध नागरी सुविधा, तक्रारींचे निवारण आणि प्रशासकीय कामकाजासाठी क्षेत्रीय कार्यालयाशी संपर्क साधावा लागतो. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयासाठी सुसज्ज आणि सोयीस्कर इमारत उभारण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नूतन इमारतीमुळे प्रशासकीय कामकाजासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होण्यास तसेच नागरिकांना सेवा देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होणार आहे.

असा साकारला पिंपरी डेअरी फार्म येथील रेल्वे उड्डाणपूल..

पिंपरी डेअरी फार्म येथे रेल्वे उड्डाणपूल उभारण्याच्या प्रकल्पासाठी स्वीकृत निविदा रक्कम ६५.२८ कोटी रुपये आहे. या उड्डाणपुलाची एकूण लांबी ५६५ मीटर आणि रुंदी १७.२ मीटर आहे. रेल्वे स्पॅन वगळता व्हायाडक्टची लांबी २४० मीटर असून, त्याची रुंदी १७.२ मीटर आहे. रेल्वे लाईनवरील व्हायाडक्टची लांबी ४५ मीटर आणि रुंदी १९.५ मीटर आहे. या दोन्ही ठिकाणी पादचाऱ्यांच्या सोयीसाठी पदपथाची व्यवस्था करण्यात आली आहे. दापोडी-निगडी रस्त्याकडील पोहोच रस्त्याची लांबी १३५ मीटर, तर रुंदी १७.२ मीटर आहे. पिंपरी बाजूकडील पोहोच रस्त्याची लांबी १४५ मीटर आणि रुंदी १७.२ मीटर आहे. सेवा रस्त्यांच्या कामामध्ये दापोडी-निगडी रस्त्याकडील पुलाच्या पोहोच रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या रेल्वे ट्रॅकपर्यंतच्या सेवा रस्त्याची लांबी २८५ मीटर आणि रुंदी ९.४ मीटर आहे. तसेच पिंपरी बाजूकडील पुलाचा पोहोच रस्ता ते पॉवर हाऊस चौक (विणा सर्कल) पर्यंतच्या रस्त्याची लांबी ७१५ मीटर आणि रुंदी १८ मीटर आहे. या दोन्ही सेवा रस्त्यांवरही पदपथाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे वाहनचालकांसोबतच पादचाऱ्यांनाही या मार्गाचा वापर करणे अधिक सोयीचे होणार आहे. या प्रकल्पासाठी संरक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून एकूण ५.९६ एकर क्षेत्र जुलै २०२२ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आले होते. त्यानंतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून या महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्पाची उभारणी करण्यात आली.



“पिंपरी चिंचवड शहराचा विस्तार वेगाने होत असून, वाढत्या लोकसंख्येबरोबरच वाहनांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीमुक्त, सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवास उपलब्ध करून देणे ही महापालिकेची महत्त्वाची प्राथमिकता आहे. पिंपरी डेअरी फार्म येथील रेल्वे उड्डाणपूल हा नागरिकांच्या दैनंदिन प्रवासातील अडथळा दूर करणारा महत्त्वाचा प्रकल्प आहे. या पुलामुळे केवळ दोन भागांमधील अंतर कमी होणार नाही, तर परिसरातील व्यापार, उद्योग आणि दैनंदिन व्यवहारांनाही चालना मिळेल.

- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

दिवाळीसाठी पिंपरी-चिंचवड आगारातून ४१० विशेष बसफेऱ्यांचे नियोजन!

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

दिवाळी सणानिमित्त गावी जाणाऱ्या प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या पिंपरी-चिंचवड आगाराच्या वतीने विशेष बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे. प्रवाशांची होणारी गर्दी आणि गैरसोय टाळण्यासाठी ३ ते ८ नोव्हेंबर या कालावधीत एकूण ४१० बसफेऱ्या चालविण्यात येणार आहेत. यामध्ये २११ अतिरिक्त, तर १९९ नियमित नियोजित बसफेऱ्यांचा समावेश आहे.



दिवाळीच्या सुट्ट्यांमुळे मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील विविध गावांकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढते. त्यामुळे प्रवाशांना वेळेत आणि सुरक्षित प्रवास करता यावा, यासाठी आगार व्यवस्थापनाने हे विशेष नियोजन केले आहे.

प्रवाशांच्या सोयीसाठी फलाटानिहाय बसची माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच गर्दीचे योग्य व्यवस्थापन आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात येणार आहे. प्रवाशांनी प्रवासादरम्यान गैरसोय टाळण्यासाठी अधिकृत तिकीट आरक्षण सुविधांचा वापर करावा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड आगार व्यवस्थापनाच्या वतीने करण्यात आले आहे.

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

SHAPE YOUR FUTURE.
LEAD WITH JUSTICE.

B.A. LL.B. (Hons.)
&
B.B.A. LL.B. (Hons.)

INTEGRATED 5 YEAR PROGRAMS



- Build a Strong Foundation in Law.
- Make an Impact.
- Create Change.

ADMISSION OPEN 2026

School of Legal Studies | Experienced Faculty | Moot Court & Practical Training | Global Exposure & Collaborations | Legal Aid Support

APPROVED BY BAR COUNCIL OF INDIA

+91-8600091180
admission@dypiu.ac.in
www.dypiu.ac.in

Apply Now